मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कमळाची शिदोरी शंकर जगतापांच्या हाती?

## शहरात पक्षाची ताकद वाढविण्यासाठी शंकर जगतापच ठरतील किंगमेकर : शंकर जगताप यांच्या नावावर शिक्का मोर्तब होण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वेगाने राजकीय घडामोडी बदलत आहे. सहानुभुतीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तसेच शिवसेना उबाठा यांच्याकडे इतर पक्षातील पदाधिकाऱ्यांचा ओघ वाढत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत या दोन्ही पक्षांचे आव्हान थोपविण्यासाठी भाजपाकडून भोसरी विधानसभेत आमदार महेश लांडगे यांना ताकद दिली जाईल. पिंपरी विधानसभा मतदारसंघातून नुकतेच अमित गोरखे यांना विधान परिषदेवर संधी मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तर चिंचवड विधानसभेतून भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्याच नावाचा विचार भाजपासाठी फायद्याचा ठरेल, अशी चर्चा रंगत आहे.



विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहे. अगदी तीन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या निवडणुकीची रणनीती आखण्यास सर्वच राजकीय पक्षांनी सुरुवात केली आहे. पक्षांमधील इच्छुकांनी सोशल मीडियावर दंड देखील थोपटले आहे. आगामी काळातील प्रत्येक मतदारसंघातील लढत ही दुरंगी, तिरंगी अनेक उमेदवारांची होईल हे अद्याप सांगणे कठीण आहे. मात्र आपापले उमेदवार शिक्कामोर्तब करण्यावर राजकीय पक्षांची चाचपणी सुरू आहे. शहरात सध्या भोसरी आणि चिंचवड या दोन विधानसभेत भाजपाचे आमदार आहेत. तर पिंपरी या एका विधानसभेत उपमुख्यमंत्री अजित पवार समर्थक अण्णा बनसोडे हे आमदार आहेत. सध्या उपमुख्यमंत्री अजित पवार युतीमध्ये सहभागी झाल्याने हा मतदारसंघ त्यांच्यासाठी राखीव ठेवला जाण्याची शक्यता आहे. भोसरी विधानसभेत मोठी ताकद असल्याने आमदार महेश लांडगे यांच्याच नावावर पुन्हा शिक्कामोर्तब होईल हे सांगणे ज्योतिषाची गरज नाही. मात्र चिंचवड विधानसभेत यावेळी शंकर जगताप यांच्याच नावाचा विचार होण्याची शक्यता आहे.

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर चिंचवड विधानसभेतील भाजपाच्या कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम शंकर जगताप यांनी केले. पदाधिकाऱ्यांचा आत्मविश्वास वाढविला. सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय देण्याची भूमिका ठेवली. त्याचाच परिपाक म्हणून विधानसभेच्या पोटनिवडणुकीत शंकर जगताप यांच्या नावाची चर्चा रंगली होती. न्हवे तर तेच उमेदवार असतील इथपर्यंत निश्चित झाले होते. मात्र दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर झालेल्या सहानुभूतीचा विचार करून आमदार अश्विनी जगताप यांना ऐनवेळी उमेदवारी दिली.

### समर्थकांकडून सोशल मीडियावर ब्रँडींग

» शंकर जगताप यांच्या समर्थकांनी सध्या सोशल मीडियावर जोरदार ब्रॅण्डिंग सुरू केले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शंकर जगताप यांचा फोटो असलेली पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या पोस्टमध्ये संकलन जगताप यांच्या नावाचा आमदार असा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे आगामी काळात समर्थकांच्या भावना नेमक्या काय आहेत ह स्पष्ट होत आहे.

असे असले तरी पोटनिवडणुकीत अश्विनी जगताप यांच्या विजयाचे सूक्ष्म प्लॅनिंग करणारे शंकर जगताप होते. लोकसभा निवडणुकीत खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयात चिंचवड विधानसभेचा मोठा सिंहाचा वाटा आहे. या ठिकाणी शंकर जगताप यांनी लावलेली ताकदच कामी आले असे बोलले जाते. शंकर जगताप यांच्या ताकदीची पक्ष नेतृत्वाला जाणीव असल्यानेच शहराध्यक्ष पदाची माळ त्यांच्या गळ्यात घालण्यात आली. या विधानसभेतील बहुतांश माजी नगरसेवक शंकर जगतापांचे नेतृत्व मान्य करतात. एका बाजूने पक्षाला सावरण्याची कामे आमदार महेश लांडगे करताना दिसत आहे. तर दुसरीकडे इतर पक्षांचे वाढते आव्हान थोपविण्यासाठी शंकर जगताप यांचाच विधानसभेसाठी विचार करणे पक्षाच्या फायद्याचे ठरेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

### महापालिकेला ताकद वाढविण्यासाठी पक्षाकडून खेळी

» विधानसभा निवडणुकीनंतर महापालिकेच्या निवडणुका होतील असे राजकीय अंदाज आहेत. महापालिकेच्या या निवडणुकीत वर्चस्व राखण्यासाठी भाजपाला शंकर जगताप यांचा मोठा उपयोग होण्याची शक्यता आहे. पक्षातील पदाधिकाऱ्यांना बळ देऊन पिंपरी चिंचवड महापालिकेत विजयाच्या गुलालात शंकर जगताप यांचा वाटा महत्वाचा ठरेल, अशी चर्चा आहे.

# पिंपरी-चिंचवड शहरामध्ये वाढतोय डेंग्यूचा प्रादुर्भाव

## वाकड, वाल्हेकरवाडी व मोशीत भागात आढळले डेंग्यूचे रुग्ण : शहरातील एकूण रुग्णसंख्या पाच

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाल्याने अनेक ठिकाणी पाणी साचून डासोत्पत्ती स्थळ तयार होत आहेत. वाकड, मोशी आणि वाल्हेकरवाडी परिसरात डेंग्यूचे पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे मागील दहा दिवसांत पाच रुग्ण आढळून आले आहेत. त्यांना उपचार करत घरी सोडले आहे. पण, एका रूग्णावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

डेंग्यू, चिकुनगुनियासारखे आजार टाळण्यासाठी महापालिकेने पावसाळा सुरू होताच खबरदारीच्या उपाययोजना राबविल्या आहेत. आस्थापनांनी तपासणी करून डासोत्पत्ती स्थळे नष्ट केली जात आहे. नागरिकांवरही कारवाई केली जात आहे. दरम्यान, जून महिनाअखेरीस शहरात तीन तर गेल्या दोन दिवसात दोन असे पाच




रूग्ण आढळले आहेत. वाकड, वाल्हेकरवाडी व मोशी अशा वेगवेगळ्या भागात डेंग्यूचे रुग्ण आढळून आले होते.

दरम्यान, शहरात एकूण ५ डेंग्यु रुग्ण आहेत. त्यापैकी ३ पुरुष व २ महिला रुग्ण आहेत. त्यापैकी ४ रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याने त्यांना घरी सोडण्यात आलेले आहे. तर उर्वरित एक रुग्ण खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे. त्या डेंग्यु आजाराचा रुग्ण निश्चित निदानासाठी सेंटीनल सेंटरचाच पॉझिटिव्ह अहवाल आवश्यक आहे. कोणत्याही रॅपीड किटचा अहवाल निश्चित निदानासाठी ग्राह्य धरण्यात येत नाही. पावसाळ्यात महापालिका क्षेत्रात डेंग्यु रोग पसरु नयेत म्हणून वेळीच खबरदारी घेणे गरजेचे आहे. यासाठी डासोत्पत्ती स्थानांवरील नियंत्रणाची उपरोक्त माहिती नागरिकापर्यंत पोहोचवून जनजागृती करण्यात येत असल्याची माहिती आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी दिली आहे.

# पुण्याला 21 टीएमसी पाणी द्या

## काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर यांची मागणी : विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मांडली पाणीटंचाईवरून लक्षवेधी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहर मोठ्या प्रमाणात विस्तारले असून अनेक भागात पाण्याची समस्या गंभीर आहे. या समस्येतून पुणेकरांची सुटका करण्यासाठी २१ टीएमसी पाण्याचा कोटा मंजूर करावा, अशी मागणी काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात केली आहे.




शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे पुणेकरांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पुणे महापालिका प्रशासनाने राज्य सरकारकडे २०.९० टीएमसी पाण्याची मागणी केली होती. परंतु, पुणे महापालिकेच्या मागणीकडे राज्य सरकारने लक्ष दिले नाही. महापालिकेत समाविष्ट गावांना अतिरिक्त पाणी देणे आवश्यक होते. परंतु, शासनाने महापालिकेला पुरेसा पाणीसाठा करण्याची मागणी करूनही वाढ केली नाही. याचा फटका पुणेकरांना सहन करावा लागत आहे. शहरातील अनेक भागात पाण्याची समस्या गंभीर आहे. या समस्येतून सुटका करण्यासाठी पुण्यासाठी २१ टीएमसी पाण्याचा कोटा मंजूर करावा, अशी मागणी काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी पावसाळी अधिवेशनात केली.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे एक टीएमसी कमी पाणीसाठा उपलब्ध आहे. घाट भागात अजूनही तुलनेने पाऊस झालेला नाही. त्यामुळे पुणेकरांवर पाणी संकटाची टांगती तलवार आहे. आमदार रवींद्र धंगेकर यांनी पावसाळी अधिवेशनात पाणीसंकटाचा मुद्दा उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले.

धंगेकर म्हणाले, 'पुण्याच्या पाणीप्रश्नावर आम्ही सातत्याने शासन आणि अधिकाऱ्यांचे लक्ष वेधत आहोत. गेल्या पावसाळी अधिवेशनात या विषयावर तारांकित प्रश्नही उपस्थित केला होता. पाऊस सुरू असूनही पुण्यातील अनेक भागात पाणी येत नाही. लाखो नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही. त्याचबरोबर काही भागात अशुद्ध पाण्याचा पुरवठा होत आहे. हे चित्र बदलून पुणेकरांची तहान भागवण्यासाठी राज्य सरकार काय उपाययोजना करणार आहे, असा प्रश्नदेखील धंगेकर यांनी यावेळी उपस्थित केला.

महापालिकेत समाविष्ट असलेल्या ३४ गावांसह पुणे शहरात पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्याचवेळी समान पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्ण आहे. नागरिकांना शुद्ध पाणी मिळत नाही. दूषित पाण्यामुळे रोगराई पसरत आहे. त्यामुळे शासनाने समान पाणीपुरवठा योजना आणि शुद्ध पाणीपुरवठ्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. टँकर माफियांवर अंकुश ठेवण्याचीही मागणी धंगेकर यांनी केली.

### कात्रज तलावातील अर्धा टीएमसी पाण्यासाठी कार्यवाही करणार - देवेंद्र फडणवीस

पुणे शहराच्या पाण्याबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरे दिली. ते म्हणाले, "जास्त पाणी वापरल्यास कायद्यानुसार दंड आकारला जातो. मात्र, त्याची वसुली अद्याप झालेली नाही. पुणे शहराची पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी मुळशी धरणातून ५ टीएमसी पाणी घेण्याबाबत लवादाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे." तसेच कात्रज भिलारेवाडीत ०.५ टीएमसी पाणी उपलब्ध असल्यास महापालिका आणि पाटबंधारे विभागाकडून तातडीने सर्वेक्षण करून ते मिळविण्यासाठी कार्यवाही करू, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

### पुण्याच्या पाण्यासाठी काँग्रेस-भाजप आमदार एकत्र

» विधानसभेत पुण्याच्या पाणीप्रश्नादरम्यान काँग्रेस आणि भाजप आमदार एकत्र आल्याचे चित्र पहायला मिळाले. या चर्चेदरम्यान भाजप आमदार माधुरी मिसाळ यांनीही पुणे शहराला भेडसावत असलेल्या पाणीटंचाईकडे सरकारचे लक्ष वेधले. महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमुळे आणि शिक्षण आणि आयटीमुळे लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे शहराला २० टीएमसीपेक्षा जास्त पाण्याची गरज आहे. त्यासाठी मुळशी धरणातून पाच टीएमसी पाणी द्यावे, अशी मागणी आमदार माधुरी मिसाळ यांनी केली.

# विशाल अग्रवाल याला पुन्हा अटक

## विशाल अग्रवाल याच्या अटकेबाबत पिंपरी चिंचवड पोलिसांनी कमालीची गुप्तता पाळल्यामुळे नवीन चर्चा सुरू

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे हिट आणि रन प्रकरणात पुणे पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. बड्या बिल्डरच्या अल्पवयीन मुलाने भरधाव कार चालवत दोघांना चिरडले होते. त्या प्रकरणानंतर पोलिसांकडून ठोस कारवाई झाली नाही. त्यानंतर माध्यमांमधून प्रचंड टीका सुरु झाली. विरोधकांनी हे प्रकरण लावून धरले. त्यानंतर पुणे पोलिसांनी अग्रवाल कुटुंबातील लोकांना आणि इतर जणांना अटक केली. त्या प्रकारानंतर पुणे पोलिसांनी बिल्डर विशाल अग्रवाल यांच्यासंदर्भात तक्रारी देण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर विशाल अग्रवालसंदर्भात अनेक तक्रारी येऊ लागल्या. आता पिंपरी चिंचवड पोलिसांनी विशाल अग्रवाल याला अटक केली. परंतु या अटकेबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात आली. त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी ही गुप्तता नेमकी का पाळली? याबाबत ही पोलRस बोलायला तयार नसल्याने पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.



### विशाल अग्रवाल पुन्हा कोर्टात

पुण्यातील पोर्षे कार अपघात प्रकरणातील आरोपी असलेल्या अल्पवयीन मुलाचे वडील विशाल अग्रवाल याला सोसायटी धारकांच्या फसवणुकीच्या गुन्ह्यात हिंजवडी पोलिसांनी अटक केली होती. हिंजवडी पोलिसांनी त्याला मंगळवारी अटक करत त्याची चौकशी सुरू केली होती. त्याला तीन दिवस पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. ती आज संपत आली आहे. त्याला आज पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

### नेहमी प्रेस काढली जाते, मग आता...

पिंपरी- चिंचवड पोलीस एरवी साधे एक पिस्तूल सापडले तरी याबाबतची प्रेस नोट जाहीर करून मीडियात बातमी येण्यासाठी धडपड करत असतात. स्वतःची पाठ थोपटून घेतली जाते. परंतु, पोर्षे कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल याला ताब्यात घेतल्यानंतरही याबाबतची माहिती पोलिसांनी मीडियात येऊ दिली नाही, याबाबत कमालीची गुप्तता पोलिसांनी का बाळगली, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

### पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

» विशाल अग्रवाल याच्या अटकेबाबत पिंपरी चिंचवड पोलिसांनी कमालीची गुप्तता पाळल्यामुळे नवीन चर्चा सुरु झाली आहे. पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. नेहमी एखादा छोट्या आरोपीस अटक केल्यानंतर त्याची माहिती पोलीस माध्यमांना देतात. परंतु चर्चेतील या बड्या आरोपीच्या अटकेची माहिती का लपवली? यासंदर्भातील गौडबंगाल काय? ही गुप्तता नेमकी का पाळली? याबाबत ही पोलिस बोलायला तयार नाही. यामुळे पुन्हा एकदा पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.

# महाविकास आघाडीकडून इंद्रायणी प्रदूषणाबाबत सत्ताधाऱ्यांच्या विरोधात 'गजर'

## इंद्रायणी नदीच्या नावाखाली गेल्या दहा वर्षात सत्ताधाऱ्यांनी खिसे भरले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातून वाहणाऱ्या इंद्रायणी नदी प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. गेल्या वर्षभरापासून इंद्रायणी अक्षरशः फेसाळलेली आहे. तेलकट तवंग दररोज पाण्यावर पसरलेला असतो. याबाबत स्थानिक प्रशासनापासून राज्याच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत तक्रारी करूनही तोडगा निघालेला नाही. नुकतीच आषाढी पालखी वारी आळंदीतून निघाली. या वारी सोहळ्यासाठी आलेल्या लाखो भाविकांना प्रदूषित इंद्रायणीचे फेसाळलेले पाणी 'आचमन' करावे लागले. यामुळे वारकऱ्यांच्या भावना तीव्र झाल्या. या भावना सत्ताधाऱ्यांना, राज्यकर्त्यांना कळाव्यात. यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने एल्गार आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.



### जलप्रदूषणामुळे भाविकांचे आरोग्य धोक्यात

» नदीची अत्यंत बिकट अवस्था झालेली आहे. नदीत मोठ्या प्रमाणात वाहून आलेली जलपर्णी, त्या जलपर्णीमुळे तेथील पाण्यातील जलजचर प्राण्यांचे जीव धोक्यात आला आहे. नदी काठच्या गावातील व महापालिकेचे मैला मिश्रित सांडपाणी थेट नदीत जाते. मात्र दुसरीकडे ट्रीटमेंट प्लांटच्या नावाखाली स्थानिक नेत्यांच्या बगलबच्चांना कोट्यावधींचे ठेके देण्यात आलेले आहेत. शहरातील अनेक कारखान्यातील केमिकल युक्त सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट ते सांडपाणी नदी पात्रात सोडल्याने, त्याचा काहीसा रंग बदलून पिवळसर झालेला आणि ते जलप्रदूषित पाणी बंधाऱ्यातून खाली पडले की त्या प्रदूषित पाण्याचा मोठ्या प्रमाणात होणारा पांढरा शुभ्र फेस. आणि तो तरंगत असणारा फेस दूरवर पर्यंत जाताना दिसत आहे. जलप्रदूषणामुळे भाविकांचे आरोग्य धोक्यात आले आहे

गुरुवारी आळंदीतील सिद्ध बेट या ठिकाणी झालेल्या आंदोलनाला शहर शिवसेना जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, प्रभारी अशोक वाळके, शहर संघटक तुषार सहाणे, शहर युवासेना प्रमुख अजिंक्य रामभाऊ उबाळे, युवासेना जिल्हा प्रमुख सचिन सानप, उपशहर प्रमुख कुणाल तापकीर, अनिल सोमवंशी, संतोष वाळके, युवराज कोकाटे, नेताजी काशीद, रावसाहेब थोरात, शैलेश मोरे, कैलास नेवासकर, दादा नरळे, अमित शिंदे, नितीन बोंडे, राजू जाधव, सागर रहाणे, सुरज झंझुरने, योगेश जगताप, काटे मामी, सुधाकर नलावडे, श्रीमंत गिरी, परशुराम आल्हाट, रूपाली आल्हाट, आशा भालेकर, शशिकला उभे, जना गोरे, दमयंती गायकवाड,अनिकेत येरूनकर, राजू खंडागळे, योगेश सोनवणे, माऊली बोऱ्हाडे, गणेश काळे, गणेश ताजने, अनिल तापकीर, मनीषा पवार, राहुल पवार, उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) माजी नगरसेविका सुलक्षणा धर शीलवंत, चिंचवड विधानसभा अध्यक्ष सागर चिंचवडे, भोसरी विधानसभा अध्यक्ष ज्ञानेश आल्हाट, पिंपरी चिंचवड शहर उपाध्यक्ष दिलीप पानसरे, समन्वयक माजी नगरसेवक गणेश भोंडवे, हेमंत बलकवडे, माणिकराव चव्हाण, सुनील कस्पटे राजेंद्र कदम, संपत पानसरे,विनायक रणसुभे सागर चिंचवडे उपस्थित होते. काँग्रेस उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, महाराष्ट्र राज्याचे न्याय विभाग उपाध्यक्ष चंद्रकांत लोंढे, माजी नगरसेवक गणेश भोंडवे, भोसरी विधानसभा अध्यक्ष ज्ञानेश्वर आल्हाट, ज्ञानेश्वर बोराडे, सागर तापकीर, किशोर तेलंग, मंगेश खंडागळे, योगेश सोनवणे, दिलीप पानसरे, पिंपरी विधानसभा उपाध्यक्ष सागर लष्करे आधी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड शहरातून इंद्रायणी नदी वाहते. म्हणून दरवर्षी जलपर्णी काढणे, नाल्यांची सफाई, ट्रीटमेंट प्लांट, रिव्हर सायक्लोथॉन अशी दुकानदारी पिंपरी चिंचवडमध्ये सुरू आहे. सत्ताधारी भाजपने या दुकानदारीच्या नावाखाली कोट्यावधींचा भ्रष्टाचार केला आहे. इंद्रायणी नदी स्वच्छतेच्या नावाखाली कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाल्यामुळेच इंद्रायणीची आज गटारगंगा झाली आहे. या सर्वांची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी आंदोलनात करण्यात आली.

### कार्यवाही केली नाही त्याला शासन जबाबदार

» आळंदीतील संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीच्या दर्शना करीता भाविक ही येत असतात. तसेच ते इंद्रायणी काठी येऊन पवित्र इंद्रायणी नदी मध्ये स्नान करतात तसेच पवित्र जल आचमन करतात. त्यामुळे नदीमध्ये स्नान केल्याने त्वचा रोग व आचमन केल्याने ते आरोग्यास हानिकारक होऊ शकते. जलप्रदूषणा मुळे नदी काठच्या गावातील पाणी पुरवठ्यावर परिणाम होत आहे. या वर्षी जानेवारी महिन्यात इंद्रायणी जलप्रदूषणामुळे केळगावातील नागरिकांना अशुद्ध (काळसर रंग) पाण्याचा पुरवठा झाला होता. स्नान करण्यासाठी सुद्धा अयोग्य असा पाणी पुरवठा त्यावेळी झाला होता. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने हे जलप्रदूषण रोखण्यासाठी योग्य ती कार्यवाही केली नाही त्याला शासन जबाबदार आहेत. तसेच या जलप्रदूषणा वर आळा बसण्यासाठी जलप्रदूषण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

# लाडकी लालपरी आता सीएनजीवर चालणार

## जिल्ह्यात 61 लालपरी धावताहेत सीएनजीवर, डिझेलचा खर्च वाचवण्यासाठी उचलले पाऊल

**पिंपरी | प्रतिनिधी**

डिझेलचा तुटवडा आणि आगारातील इंधन खर्च कमी करण्यासाठी पहिल्या टप्प्यात पुणे विभागातील ६१ लालपरी बसचे सीएनजीत रुपांतरण करण्यात आले आहे. यामुळे लाखो रुपयांची बचत होणार असून, प्रदूषणावरही आळा बसेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. शिरुर आणि राजगुरुनगर या दोन आगारातील एकूण ६१ लालपरी सीएनजीवर धावताहेत. बारामती, सासवड आणि मंचर या चार आगारांत पहिल्या टप्प्यात महामंडळाकडून स्वतंत्र सीएनजी पंप उभारण्यात येत आहे. या सर्व आगारात मिळून एकूण १३२ लालपरी सीएनजीवर धावतील.



### चार आगारात स्वतंत्र पंप

» पुणे विभागातील सर्व बसेस सीएनजीत रुपांतरित करण्यात येत असल्याने सीएनजीचा पुरवठा करण्यासाठी पहिल्या टप्प्यात बारामती, शिरुर, सासवड आणि मंचर या चार आगारांत महामंडळाकडून स्वतंत्र सीएनजी पंप उभारण्याचे काम वेगाने सुरु आहे. येत्या दोन-तीन महिन्यांत हे काम पूर्ण होणार असून, सासवड आणि शिरुर आगारात खासगी गाड्यांना सीएनजी विक्री करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. त्यामुळे सीएनजी विक्रीतून महामंडळाला आर्थिक उत्पन्न मिळणार आहे.

डिझेलच्या वाढत्या किंमतीमुळे सध्या सर्वत्र पर्यायी इंधनाचा विचार केला जात आहे. महामंडळाचा सगळ्यात खर्च डिझेलवर होतो. त्यामुळे आर्थिक तूट निर्माण होते. त्याला पर्यायी व्यवस्था उपलब्ध असल्याने टप्प्याटप्प्याने डिझेलवर धावणाऱ्या लालपरी सीएनजीमध्ये रुपांतरीत करण्यात येत आहेत. त्यामुळे एसटी महामंडळाला फायदा होत असून, येत्या वर्षभरात पुणे विभागातील सर्व एसटी या सीएनजीवर रुपांतरित करण्यात येणार आहेत. पुणे विभागात एकूण १४ आगार असून, दररोज हजारो प्रवासी एसटीने प्रवास करतात. शिक्षण, नोकरी, व्यवसाय यांसह पर्यटनासाठी प्रवाशांची हक्काची सेवा असलेली एसटी खऱ्या अर्थाने जीवनवाहिनी मानली जाते.

### विभागात 800 बस

» पुणे एसटी विभागात सध्या जवळपास ८०० बसेस आहेत. त्यापैकी ७०० ते ७५० बस या मार्गावर धावतात. उपलब्ध असलेल्या बसेसमध्ये ५०० बस जुन्या झाल्या असून, त्या सर्व बस सीएनजीमध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात शिरुर आगारातील ४७ आणि राजगुरुनगर आगारातील १४ बसेसचे सीएनजीमध्ये रूपांतरित करण्यात आलया आहेत.

# तुकोबांच्या पालखीवर फुलांची उधळण

## दौंडमध्ये जंगी स्वागत : सर्वात मोठा 31 किलोमीटरचा पल्ला पार करून यवत येथे पालखी सोहळा विसावला

**पुणे | प्रतिनिधी**

जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळा बुधवार (दि.३) हवेली तालुक्यातून दौंड तालुक्यात प्रवेश केला. यावेळी पुणे- सोलापूर महामार्गवरील पालखी मार्गातील सर्वात मोठा ३१ किलोमीटरचा पल्ला पार करून यवत (ता. दौंड) येथील काळभैरवनाथ मंदिरात तुकोबाचा पालखी सोहळा विसावला.

जगदगुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखीचा हवेली तालुक्यात लोणी काळभोर येथे मुक्काम असतो. पालखी उरुळी कांचन याठिकाणी विसाव्यासाठी थांबते. मात्र, उरुळी कांचन येथे पालखी सोहळ्याने विसावा न घेता सायंकाळी ४ वाजून १५ मिनिटांनी दौंड तालुक्यात प्रवेश केला. यावेळी दौंड तालुक्यातील नागरिकांनी, ग्रामपंचायत बोरिभडकयांच्या वतीने फुलांचा वर्षाव करीत सोहळ्याचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी संत तुकाराम महाराज पालखीच्या स्वागतासाठी दौंडचे आमदार राहुल कुल, माजी आमदार रमेश थोरात, माजी आमदार रंजना कुल, भाजपा महिला प्रदेश उपाध्यक्ष कांचन कुल, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधिकारी संजय जाधव, पोलीस उपविभागीय अधिकारी स्वप्नील जाधव, दौंडचे प्रांताधिकारी मीनाज मुल्ला, तहसीलदार अरुण शेलार, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, तालुका आरोग्य अधिकारी उज्वला जाधव, महावितरणचे अधिकारी, माजी उपसभापती नितीन दोरगे, युवा नेते गणेश थोरात, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष आप्पासाहेब पवार, ग्रामस्थ, पदाधिकारी, शासकीय कर्मचारी व यवत ग्रामस्थ मोठ्या संख्येने स्वागतासाठी उपस्थित होते.



### ग्रामीण भागातील पहिला मुक्काम

» संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त व्यावसायिक, उद्योजक यांच्यातर्फे पालखी सोबत असणाऱ्या वारकरी आणि भाविकांना जेवण, फराळ, नाष्टा, चहा, केळी, बिस्कीटांचे वाटप करण्यात आले. सोहळ्यासोबत लाखो वारकरी यांच्यामुळे भक्तीचा मळा वारकऱ्यांमध्ये फुललेला होता. अभंगाच्या ओळी, कपाळी केशरी गंध, गळ्यामधी तुळशी माळा, भगव्या पताका घेऊन पायी चालत अखंड माऊली तुकोबारायांच्या नामाचा जप अशा भक्तिमय वातावरणात जगद्गुरू संत तुकोबारायांच्या पालखीचा ग्रामीण भागातील पहिला मुक्काम यवत या ठिकाणी विसावला. टाळ- मृदंगाच्या गजरात मंत्रमुग्ध होत लाखो वारकऱ्यांसोबत पालखी सोहळा यवत येथील कालभैरवनाथ मंदिरात मुक्कामासाठी विसावला.

### 1000 किलो पिठलं, 1 लाख भाकरीचा बेत

» यवत ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी मिळून जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या वारकऱ्यांच्या जेवणासाठी जवळपास १ हजार किलोचे पिठलं आणि एक लाखांच्या आसपास भाकरीचा बेत केला आहे. यावेळी यवतमधील प्रत्येक नागरिक आपल्या इच्छेने भाजी आणि भाकरी या वारकऱ्यांसाठी श्री काळभैरवनाथ मंदिरात आणून देत असतात. ही वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा आजही यवतकर जोपासत आहेत. गावकऱ्यांकडून वैष्णवांचे आदरांतिथ्य केले आहे.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त व्यावसायिक, उद्योजक यांच्यातर्फे पालखी सोबत असणाऱ्या वारकरी आणि भाविकांना जेवण, फराळ, नाष्टा, चहा, केळी, बिस्कीटांचे वाटप करण्यात आले. सोहळ्यासोबत लाखो वारकरी यांच्यामुळे भक्तीचा मळा वारकऱ्यांमध्ये फुललेला होता. अभंगाच्या ओळी, कपाळी केशरी गंध, गळ्यामधी तुळशी माळा, भगव्या पताका घेऊन पायी चालत अखंड माऊली तुकोबारायांच्या नामाचा जप अशा भक्तिमय वातावरणात जगद्‌गुरू संत तुकोबारायांच्या पालखीचा ग्रामीण भागातील पहिला मुक्काम यवत या ठिकाणी विसावला. टाळ- मृदंगाच्या गजरात मंत्रमुग्ध होत लाखो वारकऱ्यांसोबत पालखी सोहळा यवत येथील कालभैरवनाथ मंदिरात मुक्कामासाठी विसावला.

यावेळी विविध सामाजिक संघटना, संस्था, उद्योजक, कार्यकर्ते यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर फुलांचा वर्षाव करीत संत तुकोबारायांच्या पालखीचे जंगी स्वागत करण्यात आले. पालखी पुढे असणाऱ्या अश्वाचे दर्शन घेऊन रथामध्ये ठेवलेला पादुकांचे दर्शन दुरून मिळाले तरी भाग्य लाभल्याचे वारकरी व भाविक मनोमन आनंदी होत आहेत. भक्तिमय वातावरणात वारकरी टाळ- मृदंगाच्या तालावर, अभंगांच्या ओव्यांवर धुंद होऊन नाचत होते.

यावेळी पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. रात्री ९.३० वाजता आरती झाली. रात्री जागर व कीर्तनाचा कार्यक्रम पार पडला. मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. मोबाइल चार्जिंग पॉईंट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आंघोळीचा पाण्याची व्यवस्था, आदी व्यवस्था केलेल्या आहे. वारकऱ्यांची पुरेपूर दक्षता प्रशासनाकडून घेतली आहे.

# पालखी सोहळ्याची वाट अडवल्याने अभूतपूर्व गोंधळ

## उरुळी कांचन ग्रामस्थांसह विश्वस्त व प्रशासन यांच्यात ओढाओढी

**पुणे | प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत प्रवेश केल्यांनतर परंपरेनुसार पालखी सोहळा गावात नेण्यासाठी ग्रामस्थांनी तो महामार्गावरच बुधवारी (दि. 3) दुपारी सव्वाएक वाजण्याच्या सुमारास रोखला. यावेळी उरुळी कांचन ग्रामस्थ, पालखी सोहळा विश्वस्त व पोलीस प्रशासनात अभूतपूर्व गोंधळ पाहायला मिळाला. ग्रामस्थ व पालखी सोहळ्याच्या या वादामध्ये 60 वर्षांची परंपरा मोडली आहे. तर पालखी सोहळ्याचा ग्रामस्थांनी निषेध करून विश्वस्तांचा धिक्कार केला.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळा कदमवाकवस्ती येथील मुक्काम आटोपून बुधवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास पंढरीच्या दिशेने मार्गस्थ झाला. थेऊरफाटा, कुंजीरवाडी, नायगाव फाटा, सोरतापवाडी, इनामदार वस्ती येथील ग्रामस्थांच्या शुभेच्छा घेत पालखी सोहळा उरुळी कांचन येथे पोहचला.



### वारकरी उपाशी..

»पालखीबरोबर चालत निघालेले काही वारकरी हे दरवर्षी असलेल्या ठिकाणी विसाव्यासाठी जातात. मात्र, पालखी न थांबल्याने वारकऱ्यांना उपाशी राहावे लागले आहे. ग्रामस्थांकडून पालखीबरोबर असलेल्या वारकऱ्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. परंतु, पालखी प्रमुखांनी पालखी मार्गात केलेल्या बदलामुळे वारकऱ्यांना उपाशी जावे लागले.

> उरुळी कांचन ग्रामस्थांनी ग्रामसभा घेऊन हा मुक्काम उरुळी कांचन गावाबाहेर जाऊ नये, असा ठराव लेखी स्वरूपात जिल्हा अधिकारी यांना द्यावा. तरच गावात पालखी आणायची का नाही? याचा निर्णय घेईल.
> \- माणिक मोरे, पालखी विश्वस्त

यावेळी ग्रामस्थांनी महामार्गावरच थांबून पालखी सोहळ्याचा नगारा अडविला. यावेळी हवेलीचे जेष्ठ नेते के. डी. कांचन, सरपंच अमित कांचन, माजी सरपंच संतोष कांचन, माजी सरपंच भाऊसाहेब कांचन, राजेंद्र कांचन, दत्तात्रय कांचन, बाजार समितीचे संचालक राजाराम कांचन, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अलंकार कांचन, शंकर बडेकर, माजी उपसरपंच युवराज कांचन यासह हजारो ग्रामस्थ उपस्थित होते.

पालखी सोहळ्याचा दुपारचा विसावा हा परंपरेनुसार ग्रामदैवत काळभैरवनाथ मंदिरात करावा, अशी विनंती ग्रामस्थांनी पालखी सोहळ्याच्या प्रमुखांना केली; मात्र पालखी विश्वस्त ठरलेल्या वेळापत्रकानुसार पालखी सोहळा पुढे नेण्याच्या तयारीत होते. यावेळी ग्रामस्थ, पालखी सोहळा विश्वस्त व प्रशासन यांच्यात मोठ्या प्रमाणात ओढाओढी सुरु झाली. पोलिसांनी मध्यस्थी केली; मात्र सोहळ्यातील पदाधिकाऱ्याने पोलीस अधिकारी व काही कर्मचाऱ्यांवर हात उचलला असल्याची माहिती काही नागरिकांनी दिली आहे.